# राष्ट्रीय बातमीपत्र - 09.15 P.M.

**दिनांक : 04.08.2020** **वार : मंगळवार**

---

१. आपत्कालीन पत हमी योजनेअंतर्गत सरकारी आणि खासगी बँकांनी ९२ हजार कोटीचं कर्जवाटप केल्याची अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांची माहिती.
२. अनलॉक ३ अंतर्गत रेल्वेकडून माल वाहतूक दरात सवलती जाहीर.
३. देशाचा कोविड रुग्ण बरे होण्याचा दर ६६ पूर्णांक ३१ शतांश टक्के; तर देशभरात काल एका दिवसात ६ लाख ६० हजार चाचण्या.
४. राम मंदिराच्या भूमिपूजन सोहळ्यासाठी अयोध्या नगरी सजली; उद्या पंतप्रधानांच्या हस्ते भूमिपूजन.
५. बिहारमध्ये पूरस्थिती कायम; मुसळधार पावसामुळे मुंबईचं जनजीवन विसकळीत.

---

**कर्ज वाटप**

आपत्कालीन पत हमी योजनेअंतर्गत सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना सरकारी आणि खासगी बँकांनी काल अखेर ९२ हजार कोटी पेक्षा जास्त कर्ज वाटप केलं असल्याची माहिती अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज दिली. या योजनेसाठी सरकारनं १ लाख ३७ हजार ५८६ कोटी रुपये मंजूर केले आहेत. २३ मार्च ते ३१ ऑक्टोबर २०२० या कालावधीत वाटप केलेल्या कर्जांसाठी ही योजना लागू असेल. कोरोना संसर्गाच्या काळात आर्थिक संकट दूर करण्यासाठी तसंच सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना अतिरिक्त कर्ज पुरवठा करण्याच्या दृष्टीनं ही योजना जाहीर करण्यात आली होती.

**रेल्वे**

आर्थिक व्यवहारांना आणखी चालना देण्यासाठी भारतीय रेल्वेनं अनलॉक ३ अंतर्गत माल वाहतूक दरात सुधारणा केली असून आता ग्राहकांना अधिक सवलत देण्यात येणार असल्याचं रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी सांगितलं. मालवाहतुकीला चालना देण्यासाठी रेल्वे मिशन पातळीवर काम करत असून कोरोना संकटाचं मोठ आव्हान असतानाही रेल्वेनं यंदा गेल्या वर्षीच्या तुलनेत जास्त मालवाहतूक केली आहे. प्राण्यांच्या वाह्तुकीसाठीचा विशेष दर तसंच पर्यायी गोदामातील मालाच्या वाहतुकीवर लावण्यात येणार अतिरिक्त शुल्क माफ करण्याचा निर्णय रेल्वेनं घेतला असून खुल्या वाघीण्यामधून केवळ ताडपत्री टाकून नेल्या जाणाऱ्या मालाच्या भाड्यात ४० टक्के सवलत देण्यात आली आहे.

**कोविड - देश**

देशात कोविड आजारातून बरे झालेल्या लोकांची संख्या सध्या उपचार घेत असलेल्या बाधितांच्या संख्येपेक्षा दुप्पट झाली आहे. देशातले १२ लाख ३० हजार पेक्षा जास्त लोक कोरोनामुक्त झाले आहेत. मृत्यू

दरही आणखी कमी होऊन तो आता २ पूर्णांक १० शतांश टक्के झाला आहे; अशी माहिती आरोग्य सचिव राजेश भूषण यांनी आज नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेत दिली. देशाच्या विविध भागात आतापर्यंत २ कोटींपेक्षा जास्त कोरोना चाचण्या करण्यात आल्या असून काल एका दिवसात ६ लाख ६० हजार चाचण्या झाल्याचं त्यांनी सांगितलं. अनेक राज्यांनी आर टी पी सी आर आणि रॅपिड एंटिजन टेस्टचं प्रमाण वाढवलं असून २४ राज्य आणि केंद्र शासित प्रदेशांत प्रत्येक दहा लाख लोकसंख्येमागे चाचण्यांचं प्रमाण देशाच्या सरासरीपेक्षा जास्त आहे. देशात कोविड-19 मुळे मृत्युमुखी पडलेल्या रुग्णांपैकी सुमारे ५० टक्के मृत्यू ६० आणि त्यापेक्षा जास्त वय असलेल्यांचे झाले आहेत, असही राजेश भूषण यांनी सांगितल. सुमारे 37 टक्के मृत्यू 45 ते 60 वर्ष वयोगटातल्या रुग्णांचे झाले आहेत; तर एकंदर मृतांपैकी 68 टक्के पुरुष आणि 32 टक्के महिला आहेत.

दरम्यान पुण्यातली सिरम संस्था ऑक्सफोर्ड विद्यापीठाने विकसित केलेली कोविड-19 प्रतिबंधात्मक लस तयार करत असून या लशीच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या टप्प्यातल्या मानवी चाचणीसाठी परवानगी देण्यात आली आहे, अशी माहिती ICMR चे डॉ. बलराम भार्गव यांनी दिली.

**DD आसाम**

डीडी आसाम या २४ तास उपग्रह वाहिनीचं उद्घाटन केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री प्रकाश जावडेकर यांच्या हस्ते आज झालं. ईशान्य भारताला देशाच्या विकासाचं केंद्र बनवण्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं स्वप्न असून आसामसाठी ही वाहिनी अत्यावश्यक होती; असं जावडेकर यावेळी म्हणाले-

**ध्वनी -**

> आज मुझे ख़ुशी है के आसाम को आज अपना नया दूरदर्शन चानल मिला है | सन २००० में २४ घंटे का चानल पुरे भारत के लिये था | लेकीन पूर्वोत्तर भारत के अनेक राज्यो में अब अलग अलग टीवी चानल कुछ जगह ८ घंटे काम करने वाला तैयार हुआ है | उसका प्रक्षेपण शुरू हुआ है | अरुणाचल के लिये भी अरुण प्रभा चानल शुरू हो गया है | आसाम के लिये एक अलग चानल करणा जरुरी था और वो आज दिन है | पुरे पूर्वोत्तर भारत के लोगो का कल्चर हि विविधताओ से भरा है लेकीन उसमे एकता का सूत्र है | इसलिये यह बहोत महत्वपूर्ण है की हर राज्य को अपना अपना अलग दूरदर्शन चानल हो |

प्रसार भारतीचे मुख्य कार्यकारी अधिकारी शशी शेखर वेंपती, माहिती आणि प्रसारण सचिव अमित खरे आणि दूरदर्शनचे महासंचालक मयंक अग्रवाल या कार्यक्रमाला उपस्थित होते.

**UPSC निकाल**

UPSC अर्थात केंद्रीय लोकसेवा आयोगातर्फे घेतलेल्या परीक्षेचा निकाल आज जाहीर झाला. एकंदर 829 जणांची विविध नागरी सेवांसाठी निवड झाली असून प्रदीप सिंह यानं देशातून प्रथम क्रमांक पटकावला आहे. जतीन किशोर द्वितीय तर प्रतिभा वर्मा हिनं तृतीय क्रमांक मिळवला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी UPSC मध्ये यशस्वी झालेल्या युवकांचं अभिनंदन केलं आहे. नागरी सेवेचं अत्यंत रोमांचक आणि आनंददाई क्षेत्र आपली प्रतीक्षा करत आहे, असं पंतप्रधानांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. या परीक्षेत अपेक्षित यश न मिळालेल्या युवकांनाही त्यांनी भविष्यात उज्ज्वल यशासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

या परीक्षेत अभिषेक सराफ देशात आठव्या स्थानावर; तर महाराष्ट्राची नेहा भोसले १५ व्या तर बीडचा मंदार पत्की २२ व्या क्रमांकावर आला आहे. निकालानंतर प्रतिक्रिया व्यक्त करताना मंदार पत्की म्हणाला -

**ध्वनी -**

इंजिनिअरिंग डिग्री घेतल्यानंतर एक वर्ष पूर्ण तयारी मि पुण्यात केली आहे; आणि तिथूनच मग १९वा upsc civil services चा अटेम्प्ट दिला आहे. आज निकाल आलेला आहे. परीक्षेत मेहनत, धोरण, डेडिकेशन. कोणताही विद्यार्थी असो ग्रामीण अथवा शहरी, मला वाटतं की हि गुणवत्ता असेल आणि हार्डवर्क करण्याची जिद्द असेल तर ग्रामीण किंवा शहरी असा अडथळा न येता यश मिळू शकतं. आपण आपली हुशारी, क्षमता देशासाठी देणं हेच मला ध्येय वाटतं आणि चांगलं प्रशिक्षण घेऊन आणि चांगले गुण संपादन करून महाराष्ट्राला आणि देशाला अभिमान वाटावा असं कार्य करणं हेच माझं ध्येय आहे.

यशस्वी झालेल्या महाराष्ट्रातल्या उमेदवारांचं मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी अभिनंदन केलं आहे. या युवकांना राज्य आणि देशाच्या विकासात योगदान देण्याची संधी मिळाली, ही बाब राज्यासाठी अभिमानास्पद असल्याचं ठाकरे यांनी म्हटलं आहे.

**राम मंदिर - भूमिपूजन**

राम मंदिराच्या भूमिपूजनासाठी उत्तर प्रदेशातली अयोध्या नगरी सजली असून तिथे अत्यंत उत्साहाचं वातावरण आहे. कालपासूनच या सोहळ्याच्या धार्मिक विधींना सुरुवात झाली आहे. आज होत असलेल्या दीपोत्सवानं संपूर्ण अयोध्या नगरी आणि शरयू नदीचा काठ उजळून निघाला आहे. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर भाविकांनी कार्यक्रमस्थळी गर्दी न करता आपापल्या घरात दीप प्रज्ज्वलन करावं, असं आवाहन मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी केलं होतं; त्यामुळे परिसरातली घरंही दिव्यांनी झगमगून गेली आहेत. भूमिपूजनाचा मुख्य कार्यक्रम उद्या दुपारी साडेबारा वाजता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत होणार आहे. पंतप्रधान सर्वप्रथम हनुमान गढी मंदिरात दर्शन घेणार आहेत; त्यानंतर रामलल्लाचं दर्शन घेऊन भूमिपूजनाचा कार्यक्रम होईल.

पंतप्रधानांच्या अयोध्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर तिथली सुरक्षा व्यवस्था अत्यंत कडक करण्यात आली आहे. या कार्यक्रमासाठी विविध धार्मिक पीठांच्या संत महंतांसह 175 व्यक्तींना आमंत्रण देण्यात आलं आहे, अशी माहिती श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्ट चे महासचिव चंपत राय यांनी दिली आहे.

**स्वातंत्र्य दिन**

देशाचा 74 वा स्वातंत्र्यदिन आता अवघ्या काही दिवसांवर आला आहे. यानिमित्तानं देशानं गेल्या 74 वर्षात विविध क्षेत्रात केलेल्या प्रगतीचा आढावा आकाशवाणीच्या वतीनं घेण्यात येत आहे. ग्रामीण विकासासाठी सरकारकडून सुरू असलेल्या प्रयत्नांचा हा थोडक्यात मागोवा...

**ध्वनी -**

भारत हा कृषी प्रधान देश असल्यानं देशाची मोठी लोकसंख्या ग्रामीण भागात राहणारी आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेतही ग्रामीण भागाचा वाटा मोठा असल्यानं या भागाच्या विकासासाठी केंद्र सरकारनं मोठी उद्दीष्टं आखली आहेत. त्यामध्ये गाव खेड्यांमध्ये अधिकाधिक रोजगार निर्मिती व्हावी यावर भर देण्याबरोबरच तिथलं दारिद्र्य कमी करणं, खेडी स्वयंपूर्ण करण्याच्या

दिशेनंही विशेष प्रयत्न केले जात आहेत. केंद्र सरकारनं गेल्या सहा वर्षात आखलेल्या याविषयीच्या काही धोरणांमुळे ग्रामीण भागाच्या प्रगतीचा वेग आणखी वाढला आहे. कोरोनाच्या जागतिक संकटाच्या कसोटीच्या काळातही त्यावर परिणाम झालेला नाही. ग्रामीण जनतेच्या अन्न आणि निवारा या मूलभूत गरजांबाबतच्या समस्या दूर होण्यासाठी सरकारनं जी पावलं उचलली आहेत त्यामध्ये 2016 पासून सुरू करण्यात आलेल्या ग्रामीण आवास योजनेचा उल्लेख करावा लागेल. खेड्यांमध्ये पक्की घरं बांधून देण्याच्या उद्देशानं ही योजना राबवली जात आहे. अन्नसुरक्षा योजनेची देखील कार्यक्षमतेनं अंमलबजावणी होत आहे. याशिवाय एक देश, एक शिधापत्रिका ही योजनाही नुकतीच सुरू करण्यात आली आहे. खेडी स्वयंपूर्ण व्हावीत; पुरवठा साखळी मजबूत करण्यासाठी प्रधानमंत्री ग्रामीण सडक योजनेअंतर्गत दररोज नवे रस्ते बांधले जात आहेत. विशेषतः ग्रामीण महिलांना तोंड द्यावा लागणारा पाणीप्रश्न सोडविण्यासाठी जलशक्ती मंत्रालयानं "हर घर जल" अभियान हाती घेतलं आहे. विकासाची गंगा ग्रामीण भागातील प्रत्येक घरापर्यंत पोहोचविण्यासाठी असे अनेक प्रयत्न सुरू आहेत.

आकाशवाणी बातम्यांसाठी, दल्लीहून आनंद चतुर्वेदी यांच्यासह मंजिरी गानू, पुणे.

**<u>जम्मू काश्मीर</u>**

इच्छाशक्ती प्रबळ असेल तर कुठलंही काम कठीण नाही; हे जम्मू आणि काश्मीर या केंद्र शासित प्रदेशानं दाखवून दिलं आहे. जम्मू आणि काश्मीरचा विशेष दर्जा काढून घेतल्याच्या घटनेला उद्या एक वर्ष पूर्ण होत आहे. सतत दहशतवादाचं सावट असलेल्या या भागात आता विकासाची गती वाढली आहे. सरकारच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी केली जात आहे. सौभाग्य योजनेअंतर्गत घरोघरी वीज पोहोचवण्याचं १०० टक्के उद्दिष्ट पूर्ण करून जम्मू आणि काश्मीरनं एक नवा आदर्श निर्माण केला आहे. विशेष म्हणजे हे लक्ष्य वेळेआधीच पूर्ण करण्यात आल आहे. सौभाग्य योजनेअंतर्गत इथल्या ३ लाख ५७ हजार ४०५ घरांमध्ये वीज पोहचवण्यात आली आहे. दुर्गम, डोंगराळ भाग, सीमावर्ती भाग, दूर दूर असणारी घरं, आव्हानात्मक हवामान आणि विद्युतीकरणासाठी उपलब्ध असलेला अत्यंत मर्यादित कालावधी अशा अनेक अडचणींवर मात करत जम्मू काश्मीरचा उर्जा विभाग, महसूल अधिकारी, ग्रामसेवक, लोकप्रतिनिधी अशा सर्वांनी मिळून हे लक्ष्य पूर्ण केलं.

**<u>कोठडी वाढ</u>**

एल्गार परिषद प्रकरणी अटक करण्यात आलेले दिल्ली विद्यापीठातील प्राध्यापक हनी बाबू यांच्या कोठडीत 7 ऑगस्टपर्यंत वाढ करण्याचा आदेश आज मुंबईतल्या विशेष न्यायालयानं दिला. एल्गार परिषदेतील कथित सहभागाबद्दल हनी बाबू यांना राष्ट्रीय तपास पथकानं गेल्याच आठवड्यात अटक केली होती. त्यानंतर एनआयएच्या विशेष न्यायालयानं त्यांना आजपर्यंत म्हणजे 4 ऑगस्टपर्यंत कोठडी सुनावली होती. हनी बाबू यांचे माओवाद्यांशी संबंध असल्याचे पुरावे एनआयएनं न्यायालयाला सादर केले आहेत.

**<u>पेन्शन आदेश</u>**

वयस्कर व्यक्तींना वेळच्या वेळी निवृत्तिवेतन वितरित करावं, अशा सूचना सर्वोच्च न्यायालयानं आज दिल्या. तसंच सध्याच्या कोविड-19 च्या साथीच्या पार्श्र्वभूमीवर देशभरातील वृद्धाश्रमात राहणाऱ्या वृद्धांना पीपीई किट, सॅनिटायझर्स आणि मास्क पुरवावेत, असंही न्यायालयानं सांगितलं आहे. ज्येष्ठ विधीज्ञ आणि

आणि माजी केंद्रीय मंत्री अश्विनी कुमार यांनी दाखल केलेल्या जनहित याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठानं हे आदेश दिले आहेत.

**निधन**

भारतीय रंगभूमीवरचे ज्येष्ठ दिग्दर्शक इब्राहीम अलकाजी यांचं आज नवी दिल्लीतल्या रुग्णालयात हृदयविकाराच्या झटक्यानं निधन झालं. ते ९५ वर्षांचे होते. भारतीय रंगभूमीसाठी त्यांनी मोलाचं योगदान दिलं होतं. १९४० -५० च्या दशकातले रंगभूमीवरच्या महत्त्वाच्या कलाकारांपैकी ते एक होते. राष्ट्रपती रामनाथ कोविंद, उपराष्ट्रपती एम. व्यंकय्या नायडू, पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय मंत्री प्रकाश जावडेकर, महाराष्ट्राचे राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांनी अलकाजी यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे.

**बिहार - पूर**

बिहारमध्ये पूरस्थिती अजूनही कायम असून मदत आणि बचाव कार्य वेगानं सुरू आहे. १४ जिल्ह्यातल्या ६४ लाख लोकांना या पुराचा फटका बसला आहे. गंडक आणि बागमती नद्यांनी धोक्याची पातळी ओलांडली असून २० हजार लोकांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आल आहे.

**पाऊस**

मुंबईसह उपनगराला कालपासून मुसळधार पावसानं झोडपून काढलं. या पावसामुळे सखल भागातले रस्ते जलमय झाले होते. काही ठिकाणी घरांमध्ये पाणी शिरलं. संततधार पावसामुळे जनजीवन विसकळीत झालं असून सर्व शासकीय कार्यालयांना आज सुटी जाहीर करण्यात आली होती. मिठी आणि पोयसर नदीच्या पाणी पातळीत वाढ झाल्यामुळे नदी लगतच्या वस्त्यातील नागरिकांना सुरक्षितस्थळी हलवण्यात आलं आहे. मुंबईच्या तिन्ही मार्गावरची लोकल सेवा काही काळासाठी बंद करण्यात आली होती. अनेक ठिकाणी पाणी साचल्यानं बेस्टनंही काही गाड्यांचे मार्ग बदलले होते. मध्य रेल्वेनं लांब पल्ल्याच्या काही गाड्यांच्या वेळा बदलल्या. ठिकठिकाणी पाणी साचल्यानं दादर, हिंदमाता, किंग्ज सर्कल, प्रतिक्षनगर, चेंबूर नाका, बांद्रा, सायन या भागातली वाहतूक दुसऱ्या मार्गानं वळवली होती. दुपारनंतर पावसाचा जोर कमी झाला असून ठिकठिकाणी साचलेलं पाणी ओसरत आहे. कोकणातही पालघर, रत्नागिरी, रायगड, सिंधुदुर्ग जिल्ह्यात कालपासून मुसळधार पाऊस सुरू असून अनेक नद्यांनी धोक्याची पातळी ओलांडली आहे. पुण्यासह पश्चिम महाराष्ट्रातही आज पावसाची संततधार सुरू होती.

**हवामान**

बंगालच्या उपसागरावरचा कमी दाबाचा पट्टा आणखी तीव्र झाला असून तो येत्या दोन दिवसात मध्य भारताच्या दिशेन पुढे सरकणार आहे; त्यामुळे अरबी समुद्रावरील मोसमी वाऱ्यांना अधिक बळ मिळालं असून कोकण किनारपट्टीवर ताशी ५० ते ६० किलोमीटर वेगानं वारे वाहत आहेत. या हवामानामुळे मुंबईसह कोकण आणि गोव्यात पावसाचा जोर येत्या ६ तारखेपर्यंत कायम राहील असा हवामान खात्याचा अंदाज आहे. मध्य महाराष्ट्रातला पावसाचा जोर मात्र उद्यापासून ओसरेल.